## रत्नागिरी येथील सत्र न्यायालयात

(ला.द.बिले, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांचेसमोर )

**सेशन्स केस क्रमांक ६८/२०१९**

सीएनआर क्रमांक एमएचआरटी०१००१०३९२०१९

**महाराष्ट्र सरकार फिर्यादी**

**विरुध्द**

**ऋषिकेश विजय सनगरे वगैरे आरोपी**

## नि.७ व २२ वर आदेश

(दिनांक ०२.०१.२०२० रोजी खुल्या न्यायालयात जाहीर केला )

१. नि.७ वरील अर्ज हा आरोपी नं.३ चंदनकुमार श्रीराजमंगल प्रसाद कुशवाह याने तर नि.२२ वरील अर्ज आरोपी क्रमांक २ संदीपकुमार छोटेलाल यादव याने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३९ नुसार जामीन मिळण्याकरिता केलेले आहेत.

२. रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६२/२०१९ मध्ये एकंदरीत तीन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२, ३४१ सह कलम ३४ व हत्यार कायदा कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस

कायदा कलम १३५ अन्वये दोषारोपपत्र तपासाअंती पाठविण्यात आले. या खटल्यामध्ये तीनही आरोपींविरुध्द दोषारोप दाखल करण्यात आला. मात्र आरोपी क्रमांक २ आणि ३ यांनी भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२ तसेच १२० बी चे गुन्हे केल्याच्या आरोपातून दोषमुक्त केलेले आहे. अर्थातच आरोपी क्रमांक २ आणि ३ यांच्याविरुध्द हत्यार अधिनियम कलम ३(१) सह कलम २५(१–ब ) (अ ) व कलम ५(१)(अ )सह कलम २५(१)(अ )अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपी क्रमांक २ आणि ३ दिनांक २२.०४.२०१९ पासून सुमारे आठ महिने गजाआड आहेत.

३. आरोपींकरिता वकील श्री.एन.जी.शिंदे व वकील श्री.एम.सी. नलावडे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आरोपींचा खुनाच्या कृत्यात कोणताही सहभाग नाही व तसे सरकारपक्षाचे देखील म्हणणे नाही. आरोपींना जामीनमुक्त केल्यास ते फरार होणार नाहीत व न्यायालयाच्या सर्व अटींचे कसोशीने पालन करतील. परंतू सरकारी वकील श्री.पी.एस.शेटये यांनी नि.२३ येथे नि.२२ वर अर्जावर म्हणणे दिले व त्यांचा युक्तीवाद ऐकला असता आरोपी परराज्यातील असल्याने ते फरार होतील. दोन्ही आरोपींचे कृत्य हे आरोपी क्रमांक १ च्या कृत्याइतकेच गंभीर मानले जाईल कारण गुन्हयात वापरलेले पिस्तूल हे या दोन्ही आरोपींनीच आरोपी क्रमांक १ ला दिले असा आरोप आहे.

४. आरोपींविरुध्द दाखल असलेले गुन्हयाचे स्वरुप पाहता त्यांना

जामीनावर मुक्त करावे असा निष्कर्षास न्यायालय पोहोचते. दोन्ही आरोपी हे परराज्यातील आहेत. सबब सरकारी वकीलांच्या म्हणण्याप्रमाणे ते फरार होण्याच्या शंकेचे निराकरण होण्यासाठी जास्त रकमेचा जामीन घेण्याबाबत खालीलप्रमाणे हुकुम करण्यात येतो.

## आ दे श

१. दोन्ही अर्ज मंजूर.

२. रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ६२/२०१९ मध्ये भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२, ३४१ सह कलम ३४ व हत्यार कायदा कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ च्या गुन्हयामध्ये अर्जदार आरोपी क्रमांक ३ चंदनकुमार श्रीराजमंगल प्रसाद कुशवाह व आरोपी क्रमांक २ संदीपकुमार छोटेलाल यादव यांची मुक्तता प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त ) च्या वैयक्तिक जामीनावर व तितक्याच रकमेच्या जातमुचलक्यावर करण्यात येत आहे.

३. अर्जदारांनी प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर रहावे व मध्यंतरीच्या काळातील रहिवासाचा पूर्ण पत्ता, संबंधित पोलीस स्टेशनचे नाव व पत्ता आरोपी क्रमांक २ व ३ ने न्यायालयास दयावा.

४. अर्जदारांनी प्रकरणाच्या तथ्यांशी परिचित असलेली कोणतीही व्यक्ती न्यायालयासमोर किंवा कोणत्याही पोलीस अधिका-यासमोर अशी तथ्ये उघड करण्यापासून जेणेकरुन परावृत्त होईल अशा प्रकारे तिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही प्रलोभन दाखवू नये, धमकी देउ नये किंवा वचन देउ नये.

५. अर्जदारांनी न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय भारताबाहेर जाउ नये.

६. जामीन या न्यायालयासमोर सादर करावा.

Digitally signed by Ladshet Dattaram Bile
Date: 2020.01.02 15:45:17 +0530

दिनांक – ०२/०१/२०२० (ला.द.बिले)

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, रत्नागिरी

| | | |
|---|---|---|
| Case Number | | Sessions case No. 68/2019 |
| Name of Stenographer | :- | Mrs.V.S.Kulkarni. |
| Name of Court | :- | Additional Sessions Court, Ratnagiri. |
| Date of Dictation on computer | :- | 02/01/2020 |
| Order signed by the P.O. on | :- | 02/01/2020 |
| Order digitally signed by the P.O.on | | 02/01/2020 |
| Order uploaded on | :- | 02/01/2020 |